15

306

११] श्री. विवेक भगू
१२] श्री. चेतन शहा
१३] श्री. श्रीकांत पाटील
१४] श्री. गजेंद्र लष्करी
१५] श्री. रॉकी कास्टो

मा. सभापती डॉ. शंकर वा. मटकर
सभेस प्रारंभ झाला. मा. सभापती, मा. उप-सभ
अधिकारी यांचे स्वागत करण्यांत आले.

मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ

गुरूवार दिनांक २० जानेवारी १९९४ रोजी झालेल्या मंडळाच्या १५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत:-

मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाची १५ वी बैठक गुरूवार दि. २० जानेवारी १९९४ रोजी सकाळी ११.०० वाजता गृहनिर्माण भवन येथील ३-या मजल्यावरील सभागृहांत संपन्न झाली. या बैठकीस पुढील मान्यवर उपस्थित होते.

१] डॉ. शंकर वा. मटकर ....... सभापती

२] श्री. हेमराज शहा ............ उपसभापती

३] श्री. अशोक लाल ................ मुख्य अधिकारी

४] श्री. यादवराव कांबळे सदस्य
उपसचिव,
गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग

५] श्री. पोतदार, सदस्य
प्रमुख अभियंता,
मुंबई महानगरपालिका यांचे प्रतिनिधी

६] श्री. कमलाकर शर्मा

७] श्री. व्ही. बी. वरसकर

८] श्री. शंकरराव पिटला

९] श्री. फारूख मन्सुरी

१०] श्री. महमद आजम खान

११] श्री. विवेक भर्तू

१२] श्री. चेतन शहा

१३] श्री. श्रीकांत पाटील

१४] श्री. गजेंद्र लष्करी

१५] श्री. रॉकी क्रास्टो

मा. सभापती डॉ. शंकर वा. मटकर यांचे अध्यक्षतेखाली सभेस प्रारंभ झाला. मा. सभापती, मा. उप-सभापती, सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करण्यांत आले.

बाब क्र. १५/१

विषय:- दि. २१ डिसेंबर १९९३ रोजी झालेल्या १४ व्या बैठकीचा कार्यवृतांत स्थायी करणे.

......

दि. २१ डिसेंबर, १९९३ रोजी झालेल्या १४ व्या बैठकीचा कार्यवृतांत पृष्ठ क्र. १ ते २१ वर सादर केलेला आहे. त्यावर सविस्तर चर्चा झाली. पृष्ठ क्र. १ वर अनु. ३ मध्ये सदस्य ऐवजी मुख्य अधिकारी अशी दुरूस्ती सुचविण्यांत आली.
सविस्तर चर्चेअंती १४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्यांत आला.

बाब क्र. १५/२

विषय: दि. ३० डिसेंबर १९९३ रोजी झालेल्या १४ व्या जोड बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

......

दिनांक ३०/१२/९३ रोजी झालेल्या १४ व्या जोड बैठकीचा कार्यवृत्तात पृष्ठ क्र. २३ ते ३९ वर सादर केलेला आहे. त्यावर सविस्तर चर्चा झाली. श्री. श्रीकांत पाटील यांनी सूचना केली की मंडळाच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे कार्यवृत्तांत उल्लेख करण्यांत यावा. या सूचनेची नोंद घेण्यांत आली व १४ व्या जोड बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्यात आला.

बाब क्र. १५/३

विषय: अनुपालन अहवाल.

.....

दि. ११ जानेवारी १९९३ रोजी झालेल्या निविदा समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तात पृष्ठ क्र. ४१ ते ५५ वर सादर केला आहे. त्यावर सविस्तर चर्चा झाली. निविदा समितीने केलेल्या शिफारशीनुसार मिठाईवाला चाळ क्र. ३ व ४ काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर या पुनर्बांधणी योजनेच्या कामासाठी मे. स्वस्तिक कन्स्ट्रक्शन कंपनी यांची रू. ६८,३८,२१०/- एवढया किंमतीची निम्नतम दराची निविदा मंजूर करण्याचा निर्णय एकमताने घेण्यांत आला.

पूर्तता: उपमुख्य अभियंता [पुनर्रचना]

(७)

ठराव क्र. १५/११०

मिठाईवाला चाळ क्र. ३ व ४, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर [उत्तर] या पुनर्बांधणी योजनेच्या कामासाठी मे. स्वस्तिक कन्स्ट्रक्शन कंपनी यांची रु. ६८, ३८, २१०/- [रुपये अडुसष्ट लक्ष, अडतीस हजार, दोनशे दहा फक्त] इतक्या किंमतीच्या प्रथम निम्नतम निविदा मंजूर करण्याचा निर्णय एकमताने घेण्यांत आला.

दुरुस्ती विभागाचा अनुपालन अहवाल पृष्ठ क्र. ५५ अ व ५५ब वर सादर केलेला आहे. त्यावर सविस्तर चर्चा झाली. सविस्तर चर्चेअंती इमारत क्र. २१ बी [२३] कॉपरस्मिथ रोड या इमारतीच्या दुरुस्तीस मंजुरी देण्याचा निर्णय घेण्यांत आला.

बाब क्र. १५/४

विषय: उपकर पात्र इमारतींच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याविषयीचे प्रस्ताव.

.......

पूर्तता: निवासी कार्यकारी अभियंता

उपकर पात्र इमारतींच्या पुनर्विकासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचे प्रस्ताव ५७ ते १४५ वर सादर केले आहेत. त्यावर सविस्तर चर्चा झाली. सविस्तर चर्चेअंती सादर केलेल्या पुनर्विकासाच्या ८ प्रस्तावांना ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचा निर्णय एकमताने घेण्यांत आला.

ठराव क्र. १५/१११

पुढीलप्रमाणे उपकर पात्र मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचा निर्णय एकमताने घेण्यांत आला.

[१] अंतिम भूखंड क्र. ८३२ नगररचना योजना क्र. ४ माहिम विभाग, इमारत क्र. ४-४ एच व ४ आय काशिनाथ धुरु स्ट्रीट, दादर [पश्चिम] प्रभादेवी निवास या मालमत्तेचा पुनर्विकास करणे.

[२] भूकर पहाणी क्र. १/११७५ अंतिम भूखंड क्र. ६९७ नगररचना योजना क्र. ३ माहिम विभाग, इमारत क्र. ५६-५८, ५५ अे, ५४ बी, ४४३ बी, लेडी जमशेदजी मार्ग, माहिम येथील कांगा बिल्डींग या मालमत्तेचा पुनर्विकास.

....3/-

[३] अंतीम भूखंड क्र. ११६५, नगररचना योजना क्र. ४ माहिम विभाग, इमारत क्र. ६/८ वीर सावरकर मार्ग ग/उत्तर विभाग दादर येथील "गोविंद प्रसाद" या मालमत्तेचा पुनर्विकास.

[४] भूकर पहाणी क्र. १६४१, भूखंड क्र. ३३ भायखळा विभाग, इमारत क्र. २५, सीटट स्ट्रीट भायखळा, आग्रीपाडा [प] येथील "लव्ह व्हिला" या मालमत्तेचा पुनर्विकास.

[५] अंतीम भूखंड क्र. ४७६, नगररचना योजना क्र. ३, माहिम विभाग, इमारत क्र. २७१, एस. छोटानी मार्ग, ग/उत्तर विभाग, माहिम येथील "आनंद भवन" या मालमत्तेचा पुनर्विकास.

[६] भूकर पहाणी क्र. १०४६ माहिम विभाग, इमारत क्र. १३२-सी, १३२ बी, १३२ डी, वीर सावरकर मार्ग येथील मालमत्तेचा पुनर्विकास.

[७] भूकर पहाणी क्र. १२८, मलबार हिल विभाग, इमारत क्र. २६२ वाळकेश्वर मार्ग "डी" विभाग येथील "गंगा निवास" या मालमत्तेचा पुनर्विकास

[८] अंतीम भूखंड ९८ [भाग] नगररचना योजना क्र. ४ माहिम विभाग इमारत क्र. ३४८ आय, ३४६ एच, ३४८ एच, ३४६ ए, ३४८ जी व ३४८ जीजी, लेडी जमशेदजी मार्ग फ/ग उत्तर येथील "उल्लैंगल वाडी" या मालमत्तेचा पुनर्विकास.

बाब क्र. १५/५/१

---

विषय: इमारत क्र. ७३-८३ फिका स्ट्रीट, सी विभाग या इमारतीची पुनर्बांधणी योजनेच्या खर्चास प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्याविषयीचा प्रस्ताव

......

वरील प्रमाणे पुनर्बांधणी योजनेच्या संकल्पित रु. ४९.३५ लक्ष [अंदाजित] खर्चास प्रशासकिय मंजूरी प्रदान करण्या विषयीचा

तसेच ८१-८३ किका स्ट्रीट या इमारतीस म्हाडा अधिनियम कलम ८८[३] [ब] अन्वये प्रमाणपत्र प्रदान करण्याविषयीचा प्रस्ताव पृष्ठ क्र. १४७ ते १६५ वर सादर केलेला आहे. या प्रस्तावाची सविस्तर माहिती उपमुख्य अभियंता [पुनर्बांधणी] यांनी सादर केली. या विषयावर सविस्तर चर्चा झाली. सदर बाब निविदा समितीपुढे सादर करावी अशी सूचना मा. श्री. हेमराज शहा यांनी केली, या संदर्भात उपमुख्य अभियंता [पुनर्रचना] यांनी खुलासा केला या पुनर्बांधणी योजनेच्या भू-संपादन प्रस्तावास शासनाची मंजूरी प्राप्त होण्याच्या दृष्टीने योजनेच्या अंदाजित खर्चास मंडळाने प्रशासकिय मंजुरी देणे आवश्यक आहे. सविस्तर चर्चेअंती प्रस्तावित पुनर्बांधणी योजनेच्या अंदाजित खर्चास प्रशासकिय मंजुरी देण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

ठराव क्र. १५/११२

इमारत क्र. ७३-८३, किका स्ट्रीट, सी विभाग या इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेच्या अंदाजित रु. ४९.३५ लक्ष एवढया खर्चास प्रशासकिय मंजुरी देण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

बाब क्र. १५/५/२

विषय: १५, नानाभाई पारसी चाळ, ना. म. जोशी क्रॉस लेन क्र. १ भायखळा ई विभाग या इमारतीची पुनर्बांधणी योजना - खर्चाच्या सुधारीत प्रशासकिय मंजुरीसाठी प्रस्ताव.

.........

१५ नानाभाई पारसी चाळ, ना. म. जोशी क्रॉस लेन क्र. १ भायखळा या पुनर्बांधणी योजनेच्या रु. ५०,३३,८००/- एवढया खर्चास सुधारीत प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्याविषयीचा प्रस्ताव पृष्ठ क्र. १६७ ते १७७ वर सादर केलेला आहे. या योजनेची पूरक माहिती उपमुख्य अभियंता [पुनर्रचना] यांनी सादर केली. या विषयावर सविस्तर चर्चा झाली. या चर्चेच्या वेळी मा. श्री. हेमराज शहा, श्री. शंकरराव पिटला, श्री. श्रीकांत पाटील व अन्य सदस्यांनी प्रश्न विचारला की इमारत पूर्ण होऊन दीड वर्षाच्या कालावधीनंतर प्रस्ताव प्रशासकिय मंजुरीसाठी का आला ? या संदर्भात मुख्य

.... ५/-

अधिकारी यांनी सूचना केली पुनर्बांधणी योजनेचे काम पूर्ण झाल्यानंतर साधारणत: प्रकल्पावर एकूण किती खर्च अपेक्षित आहे याची माहिती मंडळात तीन महिन्याच्या आत सादर करण्यात यावी व काम पूर्ण झाल्यानंतर १२ महिन्यांच्या कालावधीत सुधारीत प्रशासकिय मंजुरीचे प्रस्ताव मंडळाकडे सादर करण्यात यावेत.

पूर्तता:
उपमुख्य अभियंता [पुनर्रचना]

या योजनेवर प्रत्यक्ष किती खर्च वाढला आहे याची विचारण सदस्यांनी केली. उपमुख्य अभियंता [पुनर्रचना] यांनी खुलासा केला की पुढीलप्रमाणे देय रक्कम बाकी आहे.

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे अंतीम बील............ | रु. २८,१००/- |
| वास्तूशास्त्रज्ञांची फी............. | रु. ४१,४१५/- |
| | रु. ६९,५१५/- |

उपमुख्य अभियंता [पुनर्रचना] यांनी खुलासा केला की या रकमेत थोडाफार फरक येण्याची शक्यता आहे. या संदर्भात मुख्य अधिकारी यांनी संबंधितांना सूचना दिली की वरील रकमेत काही फरक झाल्यास त्यास मंडळाची अनुमती प्राप्त करण्याची आवश्यकता आहे. सविस्तर चर्चेअंती वरीलप्रमाणे रु. ६९,५१५/- या खर्चास तत्वत: मंजुरी दिली व सादर केलेल्या प्रस्तावास सुधारीत प्रशासकिय मंजुरी देण्यात आली.

ठराव क्र. १५ /११३

इमारत क्र. १५, नानाभाई पारसी चाळ, ना. म. जोशी मार्ग क्रॉस लेन क्र. १, भायखळा "ई" विभाग या पुनर्बांधणी योजनेच्या रु. ५०,३३,८००/- एवढया खर्चास सुधारीत प्रशासकिय मंजुरी देण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

बाब क्र. १५/५/३

विषय: इमारत क्र. ३४ ए-१, ३४ ए-२, ३४ बी व ३४ आय बंदूकवाला चाळ, सयानी रोड या इमारतीच्या पुनर्बांधणी खर्चास प्रशासकिय मंजुरी.

इमारत क्र. ३४ ए-१, ३४ ए-२, ३४ बी व ३४ आय बंदूकवाला चाळ, सयानी रोड या पुनर्बांधणी योजनेच्या संकल्पित

रु. २,९६,८५,०००/- खर्चास प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्या विषयीचा तसेच इमारत क्र. ३४ ए-१, ३४ ए-२ व ३४ आय बंदूकवाला चाळ, या इमारतींना म्हाडा अधिनियम ८८[३] [ब] अन्वये प्रमाणपत्र प्रदान करण्या विषयीचा प्रस्ताव पृष्ठ क्र. १७९ ते २१५ वर सादर केला आहे. सविस्तर चर्चेअंती प्रस्तावित केल्याप्रमाणे योजनेच्या खर्चास प्रशासकिय मंजुरी देण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

ठराव क्र. १५/११४

इमारत क्र. ३४ ए-१, ३४ इ-२, ३४ बी व ३४ आय बंदूकवाला चाळ सयानी रोड ग[द] विभाग या पुनर्बांधणी योजनेच्या रु. २,९६,८५,०००/- एवढ्या खर्चास प्रशासकिय मंजुरी देण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

बाब क्र. १५/६

विषय: मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळास प्राप्त होणाऱ्या अपेक्षित रु. १५० लक्ष निधीचे दुरूस्ती कामासाठी नियोजन [ Core Programme III ]

वरील विषयासंबंधीची सविस्तर टिपण्णी पृष्ठ क्र. २१७ ते २४७ व पृष्ठ क्र. २९७ ते ३०३ वर सादर केली आहे. या विषयांची पूरक माहिती उपमुख्य अभियंता [दक्षिण] व [उत्तर] यांनी सादर केली. या संदर्भात मुख्य अधिकारी यांनी खुलासा केला. पूर्वी निर्णय घेतल्याप्रमाणे थकित बिलांची रक्कम देण्यास सुरवात झाली असून सध्या अंदाजे पुढीलप्रमाणे थकित बिले आहे.

| | | |
|---|---|---|
| दक्षिण विभाग | ........ | २.६० कोटी |
| उत्तर विभाग | ........ | ०.६० कोटी |
| | एकूण | ३.२० कोटी |

मार्च १९९४ पर्यंत थकित बिलांची रक्कम किमान करण्यात येईल. सविस्तर चर्चेअंती प्रस्तावित केलेल्या नियोजन कार्यक्रमास मंजुरी देण्यात आली व सादर केलेल्या १५ अंदाजपत्रकांना व ४ सुधारीत अंदाजपत्रकांना मंजुरी देण्यात आली.

......७/-

ठराव क्र. १५/११५

परिशिष्ठ "अ" दर्शविलेल्या १४ दुरुस्तीच्या कामांना तसेच परिशिष्ठ "ब" मध्ये दर्शविलेल्या ४ दुरुस्तीच्या कामांना सुधारीत मंजुरी देण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला. तसेच प्रस्तावित केल्याप्रमाणे रु. १.६० कोटी एवढ्या खर्चाच्या दुरुस्ती नियोजन कार्यक्रमात एकमताने मंजुरी देण्यात आली. त्याचप्रमाणे परिशिष्ठ "क" मध्ये दर्शविलेल्या ९ ना हरकत प्रमाणपत्राद्वारे दुरुस्तीच्या प्रस्तावांना पुरेसा निधी उपलब्ध झाल्यानंतरच परतफेड करण्यात येईल अशा प्रकारचे हमीपत्र ना हरकत प्रमाणपत्र धारकांकडून प्राप्त करून घेण्याच्या शर्तीवर एकमताने मंजुरी देण्यात आली.

बाब क्र. १५/७

विषय: पुनर्रचित इमारतीमधील गाळ्यांचे वितरण केलेल्या भाडेकरूंची सुरक्षा अनामत भाड्यापोटी समायोजन करणे.

....

पुर्तता:
उपमुख्य
अधिकारी
[पु. गा.]

या विषयीची बाब टिप्पणी पृष्ठ क्र. ३११ व ३१२ वर सादर केली आहे. या विषयासंबंधी सविस्तर माहिती मुख्य अधिकारी यांनी दिली. या विषयावर सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती सादर केलेल्या प्रस्तावास एकमताने मंजुरी देण्यात आली.

ठराव क्र. १५/११६

बाब क्र. १५/७ मध्ये सादर केलेल्या बाबीचा सर्वांगीण विचार करून व वस्तुनिष्ठ दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेऊन मंडळाने एकमताने निर्णय घेतला की संक्रमण शिबीरातील भाडेकरूंना जेव्हा पुनर्रचित इमारतीत गाळा देण्यात येईल, तेव्हा संक्रमण शिबीरासाठी त्यांनी भरलेल्या अनामत रकमेचे समायोजन त्यांचे संक्रमण शिबीराच्या भाड्यापोटी/विजदेयकापोटी व सदर गाळ्याची थकबाकी नसल्यास भाडेकरूंच्या इच्छेनुसार भाडेकरूंनी/गाळेधारकांनी संक्रमण शिबीरासाठी भरलेली रु. ५००/– अनामत रक्कम पुनर्रचित इमारतीतील गाळ्याच्या भाड्यापोटी समायोजित करावी.

.....८/–

बाब क्र. १५/८

विषय: मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाचे
सन १९९३-९४ चे सुधारीत अंदाजपत्रक व
सन १९९४-९५ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक.

........

मुख्य अधिकारी यांनी सन १९९३-९४ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन १९९४-९५ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक सभेपुढे सादर केले. सविस्तर अंदाजपत्रक सभेच्या वेळी सदस्यांना प्राप्त झाल्यामुळे सदस्यांना या अंदाजपत्रकाचा सविस्तर अभ्यास करणे शक्य झाले नसल्याचे प्रतिपादन करून सर्व सदस्यांनी सूचना केली की या विषयावर चर्चा करण्यासाठी दिनांक ३१ जानेवारी १९९४ रोजी सकाळी ११.०० वाजता जोड बैठक आयोजित करावी. ही सूचना सर्वानुमते मान्य झाली.

पुर्तता:
सचिव

बाब क्र. १५/९

विषय: अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय.

........

[१] मा. सभापतींनी निदर्शनास आणून दिले की पुनर्रचित इमारतीत गाळयाचे वितरण झाल्यानंतर काही प्रशासकिय कारणांमुळे भाडेकरूंना काही वेळेस संक्रमण शिबीर व पुनर्रचित गाळा अशा दोन्ही ठिकाणी भाडे भरावे लागते. अशा प्रकारे रहिवाशांना दोन्ही ठिकाणचे भाडे भरावे लागू नये या दृष्टीने मंडळाने आवश्यक ती उपाययोजना करावी. सविस्तर चर्चेअंती मुख्य अधिकारी यांनी संबंधितांना सूचना दिली की इमारतीचे काम पूर्ण होण्यापूर्वी किमान १२ महिने आधी पुनर्रचित इमारतीमधील गाळे वितरणासंबंधीचा सर्व तपशिल उपमुख्य अधिकारी [पु. गा.] यांना सादर करण्यात यावा व उपमुख्य अधिकारी यांनी गाळे वितरणासंबंधी सर्व प्रक्रीया पूर्ण करून इमारत पूर्ण होण्यापूर्वी किमान २ महिने गाळे वितरणाची अंतीम यादी प्रसिध्द करण्यात यावी.

पुर्तता:
उपमुख्य अभियंता
[पुनर्रचना]

उपमुख्य अधिकारी
[पु. गा.]

[२] श्री. यादवराव कांबळे, उपसचिव गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग यांना सभागृहास पुढीलप्रमाणे माहिती सादर केली.

......९/-

३१८



i] दुरुस्ती खर्चाच्या वाढीव प्रमाणित किमान मर्यादेच्या अनुषंगाने [रु. ७५०/- प्रति चौ. मि. ] दुरुस्ती उपकरांत त्या प्रमाणांत वाढ करण्यांत यावी या प्रस्तावास मंत्रीमंडळाच्या बैठकीत मंजुरी मिळालेली असून त्यासंबंधीचा अध्यादेश लवकरच प्रसिध्द होईल.

ii] बॉम्बस्फोट व दंगलीत क्षतिग्रस्त झालेल्या इमारतीच्या दुरुस्तीसाठी झालेल्या खर्चापोटी मंडळाच्या नियमीत निधी व्यतिरिक्त सुमारे ३ कोटी एवढा निधी मंडळात उपलब्ध करुन द्यावा असा प्रस्ताव गृहनिर्माण विभागाने वित्त विभागास सादर केलेला होता, परंतु हा प्रस्ताव वित्त विभागाने नामंजुर केला आहे.

iii] शासनातर्फे मंडळास प्रदान करावयाच्या अंशदानापैकी रु. ३ कोटी एवढी रक्कम शासनाकडे उपलब्ध आहे, त्यापैकी रु. २ कोटी एवढे अंशदान पुढील महिन्यात मंडळास अदा करण्यात येईल.

३] मुंबई महानगर पालिकेचे उपकर निर्धारक व संकलक यांना माहिती दिली की डिसेंबर १९९३ पर्यंत दुरुस्ती उपकरापोटी मुंबई महानगरपालिकेने रु. १२.४५ कोटी एवढी रक्कम वसूल केली असून त्यापैकी रु. ९.५८ कोटी एवढी रक्कम रिझर्व्ह बँकेकडे जमा केली आहे. त्यांनी असेही माहिती दिली की मंडळाने रिकामी गाळ्यांची माहिती ~~देऊन या गाळ्यांना करआकारणी करु नये असा~~ प्रस्ताव सादर केल्यास एप्रिल ९४ पासून या गाळ्यांना नियमानुसार करामध्ये सवलत दिली जाईल. उपमुख्य अधिकारी [पु. गा. ] यांना या संबंधीचा प्रस्ताव मुंबई महानगरपालिकेस सादर करण्याची सूचना करण्यांत आली.

पूर्तता:
उपमुख्य
अधिकारी [पु. गा]

४] मंडळाचे कामकाज अधिक सुलभ व्हावे या दृष्टीने पुढीलप्रमाणे उपसमितींची नियुक्ती करण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

[१] निविदा समिती

[२] गाळेवितरण समिती

ठराव क्र. १५/११७

मंडळाचे कामकाज अधिक सुलभ व्हावे या दृष्टीने पुढीलप्रमाणे उपसमितींची नियुक्ती करण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

निविदा समिती

| | | |
|---|---|---|
| १] डॉ. शंकर वा. मटकर | - | सभापती |
| २] श्री. गजेंद्र लष्करी | - | सदस्य |
| ३] महमद आजम खान | - | -"- |
| ४] चेतन शहा | - | -"- |
| ५] फारुख भन्डुरी | - | -"- |
| ६] कमलाकर शर्मा | - | -"- |
| ७] व्ही. वी. वरसकर | - | -"- |
| ८] विवेक भर्तू | - | -"- |
| ९] उपमुख्य अभियंता [पुनर्रचना] | - | सदस्य सचिव |

बृहतसुचीनुसार गाळे वितरण समिती

| | | |
|---|---|---|
| १] डॉ. शंकर वा. मटकर | - | सभापती |
| २] श्री. हेमराज शहा | - | उप सभापती |
| ३] श्री. रॉदी क्रास्टो | - | सदस्य |
| ४] श्री. श्रीकांत पाटील | - | -"- |
| ५] श्री. शंकरराव पिटला | - | -"- |
| ६] सहमुख्य अधिकारी | - | सदस्य सचिव |

पुनर्रचित गाळ्याच्या भाड्याचे सुधारीत दर निश्चित करणे

[१] श्री. अशोक लाल - मुख्य अधिकारी

...११/-

[२] श्री. चेतन शहा - सदस्य

[३] श्री. आर. ई. मर्चंट - उपमुख्य अभियंता [पुनर्रचना]

या समितीने पुनर्रचित इमारती मालकी तत्वावर हस्तांतरीत करण्याविषयी निकष निश्चित करावे, असे ठरले.

मा. सभापती, उपसभापती, सदस्य, अधिकारी यांचे आभार मानल्यानंतर सभा समाप्त झाल्याचे अध्यक्षांच्या परवानगीने जाहीर करण्यांत आले.

[ अतुल हुले ]
सचिव.

मा. मुख्य अधिकारी,
दु व पु. मंडळ,

मा. सभापती
दु व पु. मंडळ

परिशिष्ठ - "अ"

... १८ जानेवारी १९९४ रोजी झालेल्या मंडळाच्या १५ व्या बैठकीत प्रशासकिय मंजुरी दिलेल्या अंदाजपत्रकांची यादी.

| अ.क्र. | विभाग | कामाचे नांव | दुरुस्ती कृप्पा मंडळ/ना.ह.पु. | अंदाजपत्रकाची रक्कम / निव्वळ टप्प्याची रक्कम | दुरुस्ती दर प्रती चौ. मि. |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| १] | डी १ | इ.क्र. १०-१२ अे. आर. रांगणेकर स्ट्रीट | पहिला मंडळ | रु ६, ९५, ७०८=०० / रु ६, ९५, ७०८=०० | ३२०. ०० |
| २] | -"- | इ.क्र. २१-२१ अे, खाडीलकर रोड | चौथा मंडळ | रु ९, ८३, ०३२=०० / रु ४, ३३, ०३२=०० | १४०६. ५४ |
| ३] | सी३/४ | इ.क्र. ४२७ उधवा भुवन जगन्नाथ शंकरशेठ मार्ग | चौथा मंडळ | रु ४, ४८, ४५८=०० / रु ३, ८४, २६४=१९ | १२१४. ५९ |
| ४] | ब | इ.क्र. १४२-१४४ कायदा मार्ग | तिसरा मंडळ | रु ३, ९५, ०४६=०० / रु ३, ००, ४१३=०० | ५८९. ८० |
| ] | सी३/४ | इ.क्र. १९१-एफ कॅव्हल क्रॉस लेन क्र. ९ | पहिला मंडळ | रु १, ०९, ५०९=०० / रु १, ०९, ५०९=०० | १८४. १२ |
| [illegible] | अ | इ.क्र. राजवाडकर स्ट्रीट | तिसरा मंडळ | रु ३, २०, ५८२=०० / रु १, ०६, ८००=०० | ३७६. ०० |
| | -"- | इ.क्र. १३५-१३७ पेरिन नरिमन स्ट्रीट | तिसरा मंडळ | रु ६, ६४, ४९३=०० / रु २, ३९, २७४=०० | ७८०. ६१ |
| | [illegible]१/२ | इ.क्र. १५९-१६५ एस. व्ही. रोड किंवा ८३-८७ भंडारी स्ट्रीट | दुसरा मंडळ | रु ६, ४०, ८९२=०० / रु ३, १०, ८९२=०० | ९५९. ११ |
| | [illegible]-१ | इ.क्र. ६५-अे, खाडिलकर मार्ग | दुसरा मंडळ | रु ३, २१, ९६२=०० / रु २, ५८, २३७=०० | ३२७. ५२ |
| | [illegible]१/२ | इ.क्र. १६०-१६२, डॉ. मारिमतुरा मार्ग | तिसरा मंडळ | रु ४, ३०, ७४९=०० / रु २, ८२, ५५२=०० | ५२४. ४६ |
| | [illegible]३/४ | इ.क्र. ५ वेलिंग्टन स्ट्रीट, धोबीतलाव, मुंबई- २ | दुसरा मंडळ | रु २, ३०, ८९७=०० / रु १, ५०, ४९५=०० | २६३. ९७ |

....२/-

(२८)



| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
|---|---|---|---|---|---|
| | | **उत्तर परिमंडळ** | | | |
| १२] | फ. ग. [उ] | इ. क्र. १०२-एच, माधववाडी, नागांव क्रॉस लेन | दुसरा / मंडळ | रु. ४, ८६, १६१=०० / रु. २, ९९, ९५२=०० | २२३०. ७२ |
| १३] | ई-२ | इ. क्र. २१, मुबारक सदन, कामाठीपुरा ४थी गल्ली | पहिला / मंडळ | रु. ४३, ०३५=०० / रु. ४५, ०३५=०० | ९२. २५ |
| १४] | फ. ग[उ] | इ. क्र. २३, मोहसीन बिल्डींग, आर. के. वैद्य मार्ग | तिसरा / मंडळ | रु. ८, ४०, ८९०=०० / रु. ४, ३१, ५६४=०० | ११३०. ०० |
| १५] | ई-१ | २१ डी, हाजी कासम चाळ, कॉपर स्मिथ रोड | पहिला / मंडळ | रु. १, ३१, २१२=०० / रु. १, ३१, २१२=०० | १३३. ४५ |

पाटेकर/

## परिशिष्ठ "ब"

मंडलाच्या दिनांक २०. १. ९३ रोजीच्या १५ व्या बैठकीत सुधारीत प्रशासकीय मंजुरी दिलेल्या अंदाजपत्रकाची यादी:-

| अ. क्र. | कामाचे नांव | दुरुस्ती टप्पा / मंडळ/ना. ह. प्र. | अंदाजपत्रकाची रक्कम / निव्वळ भाडेकरूची रक्कम | दुरुस्ती दर / प्रति. चौ. मि. |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १] | १४५-१५१ दाबुंला टॅंक रोड | तिसरा [सु] / मंडळ | रू. १०, ६७, ४६८/- / रू. ८, २६, ०५५/- | ११९७. ८४ |
| २] | २७३ शहीद भगतसिंग रोड | दुसरा [सु] / मंडळ | रू. ७, ६८, ६६५=०० / रू. ६, ८८, ६६५=०० | ८५८. ०० |
| ३] | ७-६ किमीज मार्ग | चौथा [सु] / मंडळ | रू. १७, ६०, ६४०=०० / रू. ११, २८, ०५३=०० | २४२४. ०० |
| ४] | १६२-जे, एस. एस. रोड, मोहन बिल्डींग, | चौथा [सु] / मंडळ | रू. १६, ५९, ७४२=०० / रू. १०, २५, ५८६=०० | २३०२. ८४ |

## परिशिष्ठ "क"

दिनांक ३०.१२.९३ रोजीच्या मंडळाच्या १४ व्या बैठकीत मंजुरी प्रदान केलेली ना हरकत प्रमाणपत्रांतर्गत दुरूस्ती कामांची अंदाजपत्रके [ना हरकत प्रमाणपत्र धारकांनी परताव्याची रक्कम मंडळाकडे जेव्हा निधी उपलब्ध असेल तेव्हा स्विकारण्याबाबतचे हमीपत्र देण्याच्या अटीवर मंजूरी प्रदान केलेली ]:-

| अ. क्र. | विभाग | इमारत क्रमांक व रस्त्याचे नांव | दुरूस्तीचा टप्पा | अंदाजपत्रकाची रक्कम | दुरूस्ती दर. चौ. मि. [रु] |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| १] | अ | १६-१८ काखार स्ट्रीट | दुसरा | रु. १२, ४९, ६५७/- | ९९२.५६ |
| २] | अ | १८६-१८८ बोरा बाजार स्ट्रीट | तिसरा | रु. ८, २१, २६७/- | १०२४.६७ |
| ३] | सी३/४ | ७३-७५ महर्षि कर्वे रोड | पहिला | रु. ६, ०६, ५५७/- | ५२७.७६ |
| ४] | -"- | ५८३-ओ, भिवंडीवाला बिल्डींग, जे. ए. एल. रोड | पहिला | रु. ९, २६, ४३४=०० | ४८०.०५ |
| ५] | -"- | ४९-५१ अहमद बिल्डींग, के. एम. शर्मा मार्ग [सुधारीत] | पहिला [सु] | रु. ९.०४, ७५८/- | ६४२.७६ |
| ६] | सी१/२ | १२८-१३० अली उमर स्ट्रीट | पहिला | रु. १३, ०६, ०००/- | ९८१.३७ |
| ७] | -"- | १८-२० पहिली कूपर स्ट्रीट | दुसरा | रु. ५, ५८, ०००/- | १०१८.५५ |
| ८] | अ | ४०-४२ मिन्ट रोड | पहिला | रु. ६, ५८, ८०४/- | ७४८.७८ |
| ९] | सी३/४ | २०-२२ नौरोजी शेठ मार्ग | पहिला सुधारीत | रु. ९, ६३, ४२६/- | ७२६.४७ |

# मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ

दिनांक ३१ जानेवारी १९९४ रोजी झालेल्या १५ व्या बोर्ड बैठकीचा कार्यवृत्तांत.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची १५ वी बोर्ड बैठक सोमवार दिनांक ३१ जानेवारी १९९४ रोजी सकाळी ११.०० वाजता गृहनिर्माण भवनातील ३ ऱ्या मजल्यावरील सभागृहांत संपन्न झाली. या बैठकीस पुढील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १] | डॉ. शंकर वामन म्हटकर | सभापती |
| २] | श्री. हेमराज शहा | उपसभापती |
| ३] | श्री. अशोक लाल | मुख्य अधिकारी |
| ४] | श्री. पोतदार, कार्यकारी अभियंता [प्रमुख अभियंता, मुंबई म. न. पा. यांचे प्रतिनिधी | सदस्य. |
| ५] | श्री. व्ही. बी. वरसकर | "-" |
| ६] | श्री. कमलाकर शर्मा | -"- |
| ७] | श्री. शंकरराव पिटला | -"- |
| ८] | श्री. फारुख मन्सूरी | -"- |
| ९] | श्री. विवेक भुर्तू | -"- |
| १०] | श्री. आजम खान | -"- |
| ११] | श्री. चेतन शहा | -"- |
| १२] | श्री. श्रीकांत पाटील | -"- |
| १३] | श्री. गजेंद्र लष्करी | -"- |
| १४] | श्री. रॉकी क्रास्टो | -"- |

श्री. यादवराव कांबळे, उपसचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग यांना मंत्रालयांत एकाच वेळी झालेल्या बैठकीस उपस्थित रहावयाचे असल्याने मंडळाच्या बैठकीस उपस्थित रहाणे शक्य नसल्याचे श्री. कांबळे यांनी आगावू कळविले होते. मा. सभापती डॉ. शंकर वामन म्हटकर यांचे अध्यक्षतेखाली सभेस प्रारंभ झाला. सभेचे नियमित कामकाज सुरु होण्यापूर्वी मुख्य अधिकारी श्री. अशोक लाल यांनी महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागाचे सचिव श्री. ललित दोशी यांच्या आकस्मित निधनाची माहिती सभागृहास दिली. मा. नामदार शरद पवार, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्यासोबत श्री. ललित दोशी हे शासनाचे प्रतिनिधी म्हणून परदेश दौऱ्यावर गेले असता दि. ३० जानेवारी ९४ रोजी रात्री स्वित्झर्लंड येथे श्री. दोशी यांचे आकस्मिक निधन झाले. मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की श्री ललित दोशी यांनी गेली २६ वर्षे महाराष्ट्र शासनाच्या विविध पदावर महत्त्वपूर्ण कामगिरी केलेली आहे. १९८३ ते ८५ या कालावधीत त्यांनी सचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग व प्राधिकरणाचे सदस्य म्हणून महत्त्वपूर्ण कामगिरी केली होती. त्यानंतर उद्योग विभागाचे सचिव म्हणून श्री. दोशी यांनी दिलेले योगदान उल्लेखनीय आहे. श्री. ललित दोशी यांच्या निधनाबद्दल सर्व उपस्थितांनी दुःख व्यक्त केले व पुढील ठराव एकमताने संमत केला.

ठराव क्र. १५/११८

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागाचे सचिव श्री. ललित दोशी यांच्या आकस्मिक निधनामुळे मंडळास तीव्र दु:ख होत आहे. कै. ललित दोशी यांच्या कुटुंबियांच्या दु:खात मंडळाचे सभापती, उपसभापती, सर्व सदस्य व अधिकारी सहभागी आहेत. मृतात्म्यास चिरशांती लाभावी ही प्रार्थना. वरील ठराव मंडळाने एकमताने संमत केला.

दिनांक २४-१-९४ रोजी छत्रीवाला चाळ, गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल या इमारतीस झालेल्या अपघातात श्रीमती निर्मला बाल सोलंकी या रहिवाशी महिलेचे निधन झाले याबद्दल सभागृहाने तीव्र दु:ख व्यक्त करुन पुढीलप्रमाणे दुखवटयाचा ठराव एकमताने संमत केला.

ठराव क्र. १५/११९

दिनांक २४-१-९४ रोजी छत्रीवाला चाळ, गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल या इमारतीस झालेल्याअपघातात तेथील रहिवाशी श्रीमती निर्मला बाल सोळंखी यांचे निधन झाल्यामुळे मंडळास तीव्र दु:ख होत आहे. मंडळाचे सभापती, उपसभापती, सदस्य व अधिकारी श्रीमती सोलंकी यांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी होत आहेत. मृतात्म्यास चिरशांती लाभो ही प्रार्थना.

ठराव एकमताने संमत.

वरील व्यक्तिंच्या निधनाबद्दल सर्व उपस्थितांनी दोन मिनिटे स्तब्धता पाळून श्रध्दांजली अर्पण केली.

बाब क्र. १५/४/१

विषय : उपकरपात्र इमारतींच्या पुनर्विकासासाठी "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करावयाचे प्रस्ताव.

उपकरपात्र इमारतींच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करावयाचे प्रस्ताव पृष्ठ क्र. ३९१ ते ४१५ वर सादर केले आहेत. या प्रस्तावानंतर सविस्तर चर्चा झाली. सविस्तर चर्चेअंती प्रस्तावांत नमूद केलेल्या शर्तींच्या अधीन राहून सादर केलेल्या ३ पुनर्विकासाच्या प्रस्तावांना ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचा निर्णय एकमताने घेण्यांत आला.

ठराव क्र. १५/१२१

पुढीलप्रमाणे उपकरपात्र मालमत्तांच्या पुनर्विकासासाठी प्रस्तावित केलेल्या शर्तीनुसार ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचा निर्णय एकमताने घेण्यांत आला.

१] अंतिम भूखंड क्र. २१२, नगररचना योजना क्र. ४, माहिम विभाग, इमारत क्र. ३६ डी. एल. वैद्य मार्ग, दादर (प.) या मालमत्तेचा पुनर्विकास करणे.

२] भूकर पाहणी क्र. ११८, १/११८ व २/११८ ताडदेव विभाग, इमारत क्र. १४ ओ, १४ सी व १४ एफ अरब गल्ली "ड" विभाग या मालमत्तेचा पुनर्विकास करणे.

३] भूकर पहाणी क्र. ७२, इमारत क्र. ८७, नाथालाल पारेख मार्ग "अ" विभाग येथील "वेस्ट व्ह्यू" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेचा पुनर्विकास करणे.

बाब क्र. १५/१०

विषय : इमारत क्र. ८२-९२ ओ, सारा इमाम रोड, भेंडीबाजार, सी विभाग, मुंबई ३ या पुनर्रचित इमारतीस नांव देण्याविषयीचा प्रस्ताव

वरील प्रमाणे पुनर्रचित इमारतीस "रिफाई मंजील" हे नांव देण्याचा प्रस्ताव पृष्ठ क्र. ४१७ वर सादर केलेला आहे. उपमुख्य अभियंता (पुनर्रचना) यांनी प्रस्तावाची माहिती दिली. सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्तावास एकमताने मंजूरी देण्यांत आली.

ठराव क्र. १५/१२२

इमारत क्र. ८२-९२ ओ, सारा इमाम रोड, सी विभाग, मुंबई - ३ या पुनर्रचित इमारतीस "रिफाई मंजिल " [ ] असे नांव देण्याविषयीचा प्रस्ताव मंडळाने एकमताने मंजूर केला.

बाब क्र. १५/८

विषय : सन १९९३-९४ या वर्षाच्या सुधारित अंदाजपत्रकास तसेच १९९४-९५ या वर्षाच्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.

---

मंडळाचे मुख्य लेखाधिकारी श्री. श्रीधर कोचरेकर यांनी सन १९९३-९४ या वर्षाचे सुधारित अंदाजपत्रक व १९९४-९५ या वर्षाचे अंदाजपत्रक सभागृहास सादर केले व अंदाजपत्रकातील तरतुदींची सभागृहास माहिती दिली. अंदाजपत्रकावर झालेल्या चर्चेत मा. सर्वश्री. हेमराज शहा, चेतन शहा, शंकरराव पिटला, श्रीकांत पाटील, विवेक शर्दु व अन्य सदस्यांनी भाग घेतला. सदस्यांनी प्रतिपादन केले की मंडळाच्या उपक्रमांसाठी मर्यादित निधी आहे. दुरुस्ती उपकर आणि पुनर्रचित व संक्रमण शिबिरातील गाळ्यांचे भाडे हे निधी उभारणीचे प्रमुख मार्ग आहेत. दुरुस्ती उपकराची तसेच भाड्याच्या थकबाकीची योग्य प्रकारे वसुली होत नसल्यामुळे मंडळास अपेक्षित निधी उपलब्ध होवू शकत नाही व याचा परिणाम मंडळाच्या उपक्रमांवर होत आहे. निधी अभावी पुनर्बांधणी कार्यक्रमास योग्य ती गती न दिल्यामुळे जुन्या इमारतीमधील रहिवाशांना दीर्घ काळ संक्रमण शिबिरात रहावे लागत आहे. या रहिवाशांना पुन्हा मूळ जागी प्रस्थापित करावे यासाठी पुनर्बांधणी कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर हाती घेण्याची आवश्यकता आहे. छोटे भूखंड असलेल्या अनेक इमारतींची पुनर्बांधणी होवू शकली नाही. या भूखंडावर पुनर्बांधणी योजनेची शक्यता अजमावून पहाण्याची आवश्यकता आहे. श्री. पोतदार यांनी माहिती दिली की अशा प्रकरणी मुंबई महानगरपालिकेचे धोरण उदार आहे. अशा प्रकारच्या छोट्या भूखंडावरील योजनेच्या आराखड्यांना मुंबई महानगरपालिकेने तत्परतेने मंजूरी दिल्याची माहिती त्यांनी दिली. उपमुख्य अभियंता [पुनर्रचना] यांनी माहिती दिली की छोट्या भूखंडावरील पुनर्बांधणी योजनेची शक्यता अजमावण्याच्या कामास सुरुवात झालेली आहे. अशा काही योजनांच्या आराखड्यास मुंबई महानगरपालिकेने मंजूरी दिली आहे. त्याच धर्तीवर अन्य पुनर्बांधणी योजनांचे आराखडे तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. सदस्यांनी असेही निदर्शनास आणून दिले की आरक्षण असलेल्या भूखंडावर योजना कार्यान्वित करता येत नाही. आरक्षित भूखंडावर अनेक इमारती अस्तित्वात असल्यामुळे मुंबई म. न. पा. स आरक्षणाच्या भूखंडाचा विकास करता येत नाही. त्यामुळे या भूखंडाचा अनधिकृत वापर होत आहे. श्री. पोतदार यांनी अशी माहिती दिली की, शाळा, दवाखाना, वाचनालय, कल्याण केंद्र अशा प्रकारचे आरक्षण असलेल्या भूखंडावरील काही पुनर्बांधणी योजनांचे आराखडे विहित अटी व शर्तीवर मुंबई म. न. पा. ने मंजूर केले आहेत. परंतु मोठे क्रिडांगण किंवा उद्यानाचे आरक्षण असलेल्या भूखंडावर पुनर्बांधणी योजनेचे आराखडे मंजूर करता,

येणार नाहीत. मात्र अशा भूखंडावर पारंपारीक पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपाची इमारत बांधण्याची परवानगी देता येईल काय, या विषयीचा विचार सुरु आहे.

ना हरकत प्रमाणपत्राद्वारे पुनर्विकास होणाऱ्या इमारतीमधील मंडळास उपलब्ध होणारे गाळे राजीव गांधी निवारा प्रकल्पाने ठरविलेल्या बाजारभावाने बृहतसूचीवरील रहिवाशांना मालकी तत्वावर वितरीत करणे शक्य आहे. याबाबत विचार व्हावा असे सदस्यांनी सुचविले. सदस्यांनी निदर्शनास आणून दिले की मंडळाच्या पुनर्रचित गाळ्यांची तसेच संक्रमण शिबिरातील गाळ्यांच्या भाड्याची वसूली योग्य प्रकारे होत नसल्यामुळे मंडळाच्या उत्पन्नात फार मोठी तूट येत आहे. त्यामुळे भाडेवसूली तसेच थकबाकीची वसूली प्रभावीपणे करण्याची आवश्यकता असल्याचे सदस्यांनी सांगितले. मोठ्या प्रमाणात थकबाकी असलेल्या भाडेकरुविरुध्द अधिनियमातील तरतुदीनुसार ठोस कार्यवाही करावी अशी सूचना केली. मंडळास पुरेसा निधी उपलब्ध होवून मंडळाचे उपक्रम प्रभावीपणे कार्यान्वित व्हावेत या दृष्टिने सदस्यांनी पुढील सूचना केल्या.

१] दुरुस्ती उपकरांत त्यांच्या प्रमाणांत वाढ करण्याची शासनाकडे मागणी व पाठपुरावा करणे.

२] दुरुस्ती उपकराच्या थकबाकीची वसूल प्रभावीपणे व्हावी या दृष्टिने मुंबई महानगरपालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करुन कार्यपध्दती ठरविणे.

३] पुनर्रचित गाळ्यांच्या भाड्यांत वा[illegible]च्या दृष्टिने प्रस्ताव सादर करणे.

४] मंडळाच्या गाळ्यांची भाडेवसूली प्रभावीपणे करणे.

५] भाडेवसूलीचा अहवाल प्रत्येक बैठकीत सादर करणे.

६] छोट्या भूखंडावर व आरक्षण असलेल्या भूखंडावर पुनर्बांधणी योजना कार्यान्वित करण्याच्या दृष्टिने उपाययोजना करणे.

७] छोट्या तसेच आरक्षण असलेल्या भूखंडांची यादी पुढील बैठकीत सादर करणे.

८] ना हरकत प्रमाणपत्राद्वारे पुनर्विकास होणाऱ्या इमारतींमधे उपलब्ध होणारे अतिरिक्त गाळे बाजारभावाने मालकी तत्वावर वितरीत करण्याविषयी विचार करणे.

९] वरीलप्रमाणे उपलब्ध होणाऱ्या अतिरिक्त गाळ्यांची माहिती पुढील बैठकीत सादर करणे.

१०] पुनर्रचित गाळ्यामध्ये रहाणाऱ्या अनधिकृत व्यक्तिंना नियमित करण्यासाठी वाढीव दराने हस्तांतरण रक्कम आकारण्या विषयीचा प्रस्ताव प्राधिकरणास सादर करणे.

सविस्तर चर्चेअंती सन १९९३-९४ च्या सुधारीत अंदाजपत्रकात बदल करुन तसेच सन १९९४-९५ या वर्षाच्या सादर केलेल्या अंदाजपत्रकास मंजूरी देण्याचा निर्णय एकमताने घेण्यांत आला.

ठराव क्र. १५/१२०

एकमताने निर्णय घेण्यांत आला की पुढीलप्रमाणे सुधारणांसह १९९३-९४ या वर्षाचे सुधारीत अंदाजपत्रक मंजूर करण्यांत आले. जमेसाठी रू. ५३२२.१८ लक्ष व खर्चासाठी रू. ५३१८.०४ लक्ष एवढ्या सुधारीत अंदाजपत्रकास मंजुरी देण्यांत आली. मंडळाचे सन १९९४-९५ चे अंदाजपत्रक जमेसाठी रू. ४८९३.१२ लक्ष व खर्चासाठी रू. ५१३४.५६ लक्ष एवढ्या तरतुदींसह मंजूर करण्यांत आले. पुढे असाही निर्णय घेण्यांत आला की सन १९९४-९५ मध्ये मंडळाच्या जमेत सुमारे रू. ८००.०० लक्ष एवढी वाढ झाल्यास त्याचे वितरण सर्वसाधारणपणे पुढीलप्रमाणे करण्यांत यावे.

| | | |
|---|---|---|
| १] | पुनर्रचित इमारतींचे बांधकाम | रू. २२०.०० लक्ष |
| २] | संक्रमण शिबिरांचे बांधकाम | रू. ५०.०० लक्ष |
| ३] | नियमित दुरुस्ती व विशेष दुरुस्ती | रू. १००.०० लक्ष |
| ४] | संरचनात्मक दुरुस्ती | रू. २००.०० लक्ष. |

बाब क्र. १५/११

विषय : कर्मवीर भाऊराव पाटील, विद्यालय, प्रतिक्षा नगर, सायन यांना शाळेसाठी पर्यायी गाळे देण्याचा प्रस्ताव.

सदर प्रस्ताव पृष्ठ क्र. ४२१ ते ४२२ वर सादर केला आहे. सहमुख्य अधिकारी यांनी प्रस्ताव विषयीची सविस्तर माहिती सभागृहास दिली. सविस्तर चर्चेअंती चाळ क्र. १२६,१२७,१२८ व १३० या बैठ्या चाळींमधील १६ गाळे शाळेसाठी तात्पुरती पर्यायी जागा म्हणून "एकलव्य शिक्षण साधना" या संस्थेस प्रस्तावित केलेल्या अटी व शर्तीवर वितरण करावे असा निर्णय एकमताने घेण्यांत आला.

ठराव क्र. १५/१२३

एकलव्य शिक्षण साधना या संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील, विद्यालया साठी प्रतिक्षानगर, सायन येथील चाळ क्र. १२६,१२७,१२८ व १३० या मधील १६ खोल्या उपलब्धतेनुसार पुढीलप्रमाणे अटी व शर्तीवर तात्पुरती पर्यायी व्यवस्था म्हणून वितरीत करण्याचा निर्णय एकमताने घेण्यांत आला.

१] संस्थेकडे सध्या असलेले १६ गाळे रिक्त करुन मंडळाच्या ताब्यांत देण्यात यावेत.

२] प्रत्येक गाळ्यासाठी रु. २०००/- याप्रमाणे अनामत रक्कम मंडळाकडे अगाऊ भरण्यांत यावी.

३] प्रत्येक गाळ्यास आर्थिक भाडे रु. १६६/- अधिक सेवाआकार रु. ३५/- मिळून दरमहा रु. २०१/- प्रति गाळा भरावे लागतील. याआकारांत वाढ झाल्यास त्यानुसार वाढीव रक्कम भरणे संस्थेवर बंधनकारक राहील.

४] सदर गाळे शाळेस वितरीत केल्यामुळे महानगरपालिकेच्या करामध्ये वा अन्य सेवाआकारांत वाढ झाल्यास सदर आर्थिक भार संस्थेस भरावा लागेल.

५] विद्युत पुरवठ्याचे देयक संस्थेने बी. ई. एस. टी. स परस्पर भरावे.

६] गाळ्यांची मोडतोड किंवा अन्य प्रकारचे नुकसान झाल्यास गाळा पूर्वस्थितीत ठेवण्यासाठी मंडळाने ठरविलेली अंदाजित रक्कम संस्थेस मंडळाकडे जमा करावी लागेल.

७] मंडळाच्या आवश्यकतेनुसार गाळे परत करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

बाब क्र. १५/१२

विषय : इमारत क्र. ३३७-३३९ छत्रीवाला चाळ, गणपतराव कदम मार्ग, ग/द विभाग या इमारतीच्या दुरुस्ती अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव.

---

उपमुख्य अभियंता [उत्तर] यांनी पृ० क्र. ४३१ वर सादर केलेल्या प्रस्तावाची माहिती दिली.

सर्वश्री शंकरराव पिटला व अन्य सदस्यांनी प्रश्न विचारला की इमारतीच्या धोकादायक अवस्थेची संबंधित अधिकाऱ्यांना पूर्व कल्पना कां येवू शकली नाही ? उपमुख्य अभियंता [उत्तर] यांनी माहिती दिली की पूर्व पावसाळी सर्वेक्षणाच्या वेळी या इमारतीत कोणत्याही धोका सांगणारे निदर्शनास आलेले नव्हते. अपघातापूर्वी इमारतीत धोका असल्याचे कोणत्याही रहिवाश्यांच्या निदर्शनास आलेले नव्हते. रहिवाश्यांच्या माहितीनुसार अपघात अचानकपणे झालेला आहे. सदस्यांनी तक्रार केली की दुपा ११.०० वाजता अपघात झाल्यानंतर अपघाताचे वृत्त सदस्यांना रात्री ९.०० वा. नंतर कळले. सदस्यांनी सूचना केली की अपघात झाल्यानंतर सदर वृत्त सदस्यांना कळविण्याविषयीची व्यवस्था करण्यांत यावी. या सूचनेची नोंद घेण्यात आली.

उपमुख्य अभियंता [उत्तर] यांनी अशी माहिती सादर केली की या इमारतीच्या संडासाचा अर्धा भाग कोसळला इमारतीचा अन्य भाग धोकादायक अवस्थेत नाही. त्यामुळे इमारतीच्या संडासाच्या आसपासच्या भागाची दुरुस्ती करुन इमारत संरचनात्मक दृष्टया सुस्थितीत ठेवता येईल. इमारतीच्या दुरुस्तीच्या कामासाठी अंदाजपत्रक तयार केले असून तिसऱ्या टप्प्याच्या दुरुस्तीच्या कामासाठी अंदाजपत्रक तयार केले असून तिसऱ्या टप्प्याच्या दुरुस्तीचा खर्च रु. १४.६८ लक्ष एवढा येण्याची अपेक्षा आहे. हा खर्च दुरुस्ती प्रमाणित खर्चाच्या मर्यादेपेक्षा रु. ६.७० लक्ष अधिक येत आहे. रहिवाशांनी ही अतिरिक्त भार स्वीकारल्यास तिसऱ्या टप्प्यांच्या संपूर्ण दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येईल. अपघातग्रस्त संडासाच्या भागाच्या दुरुस्तीसाठी सुमारे रु. १.०० लक्ष एवढा खर्च येण्याची अपेक्षा आहे. सविस्तर चर्चेअंती असा निर्णय घेण्यांत आला की संडासाच्या भागाची दुरुस्ती तातडीने हाती घ्यावी व या कामासाठी रु. १.०० लक्ष खर्चास मंजूरी देण्यांत आली.

<u>ठराव क्र. १५/१२४</u>

इमारत क्र. ३३७-३३९ छत्रीवाला चाळ, गणपतराव कदम मार्ग, ग/द या इमारतीच्या अपघातग्रस्त संडासाच्या भागाच्या दुरुस्तीसाठी रु. १.०० लक्ष एवढा खर्चाची दुरुस्ती करण्यास मंजूरी देण्यांत आली.

बाब क्र. १५/१३

विषय : अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय.

मंडळाचे काम अधिक प्रभावीपणे व्हावे या दृष्टिने म्हाडा अधिनियम कलम १८ [१०] अन्वये तांत्रिक समिती गठीत करावी अशी सूचना सदस्यांनी केली. सविस्तर चर्चेअंती ही सूचना मान्य करण्यात आली व पुढीलप्रमाणे ठराव एकमताने मंजूर केला.

ठराव क्र. १५/१२५

म्हाडा अधिनियम कलम १८ [१०] अन्वये मंडळाच्या पुढीलप्रमाणे सदस्यांच्या समावेश असणारी तांत्रिक समिती गठीत करण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

१] श्री. शंकर बा. पटकर – सभापती
२] श्री. हेमराज शहा – उपसभापती
३] श्री. शंकरराव पिटला – सदस्य
४] श्री. श्रीकांत पाटील – सदस्य
५] श्री. रॉकी क्रास्टो – सदस्य
६] श्री. विवेक भार्तु – सदस्य
७] श्री. चेतन शहा – सदस्य.

म्हाडा अधिनियम कलम १८ [१०] अन्वये तरतुदींच्या आधीन राहून या तांत्रिक समितीने काम करावे असा ही निर्णय एकमताने घेण्यात आला.

मंडळाची १६ वी बैठक गुरुवार दिनांक २४ फेब्रुवारी १९९४ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्याचे एकमताने ठरले.

मा. सभापती, उपसभापती, सदस्य अधिकारी व निमंत्रित यांचे आभार मानल्यानंतर सभा समाप्त झाल्याचे अध्यक्षांचे परवानगीने जाहीर करण्यात आले.

[ अतुल हुले ]
सचिव

मुख्य अधिकारी
दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ.

सभापती
दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ.